जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७७९ दिनांक - ०२/११/२०२३**

दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१,गुन्हे शाखा,पुणे शहर

## दोन वर्षापासुन फरार असलेल्या आरोपीस केले जेरबंद

दिनांक ३१/१०/२०२३ रोजी मा.वरिष्ठांकडुन पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कोंबिग ऑपरेशन राबविणेबाबत आदेशित करण्यात आले आहे.त्या अनुषंगाने श्रेणी.पोलीस उप निरीक्षक शेख, पो अंमलदार असे पुणे शहर पोलीस आयुक्तालयाचे हद्दीत कोंबिग ऑपरेशनचे अनुषंगाने पेट्रोलिंग करीत असताना पेट्रोलिंग दरम्यान हवेली पोलीस स्टेशन कडील भादंवि कलम ३७६ (२) (j)(n)(I) ३५४ (ड),५०६ बालकाचे लैंगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ प्रमाणे दाखल गुन्हया मधील पाहिजे फरारी आरोपी लक्ष्मण पाटील हा एस.पी कॉलेज जवळील खजीना विहीर तालीम समोर,टिळक रोड पुणे येथे येणार असलेबाबतची खात्रीशीर बातमी स्टाफ मधील **पो.अंमलदार, महेश पाटील व सुमित ताकपेरे** यांना मिळाल्याने सदरची बातमी ही मा.वपोनि इंदलकर, दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक १,गुन्हे शाखा,पुणे शहर यांना कळविली असता त्यांनी कायदेशीर कारवाई करण्याचे आदेशित केले.

प्राप्त बातमीचे अनुषंगाने अधिकारी व वर नमुद केले स्टाफ असे मिळालेल्या बातमीचे ठिकाणी जावुन वरील पाहिजे आरोपीचा शोध घेतला असता वर नमुद पाहिजे आरोपी लक्ष्मण पाटील हा एस.पी कॉलेज जवळील खजीना विहीर तालीमचे बाहेरील फुटपाथवर उभा असलेला मिळुन आल्याने त्यास आहे त्या परिस्थितीत ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव,पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव,**लक्ष्मण महादेव पाटील,वय २५ वर्षे, रा.मु.पो.डोणजे,ता.हवेली,जि.पुणे** असे असल्याचे सांगितले. त्यास अधिक विश्वासात घेवुन दाखल गुन्ह्याबाबत त्याचेकडे चौकशी करता सदरचा गुन्हा हा त्याने व त्याचे इतर ४ ते ५ साथीदार यांनी मिळुन केला असल्याचे कबुली दिल्याने व दाखल गुन्ह्यामध्ये त्याचा सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने सदर आरोपीस पुढील कार्यवाही करीता हवेली पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण यांचे ताब्यात देण्यात आले आहे.दाखल गुन्ह्याचा पुढील तपास हवेली पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण हे करीत आहेत.

सदरची कारवाई पुणे शहरचे मा.पोलीस आयुक्त,श्री.रितेशकुमार, मा.पोलीस सह आयुक्त,श्री. संदीप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,(गुन्हे),श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप-आयुक्त,गुन्हे,श्री.अमोल झेंडे, मा.सहा.पोलीस आयुक्त,गुन्हे-१,श्री.सुनिल तांबे यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक,दरोडा व वाहनचोरी विरोधी पथक-१,गुन्हे शाखा,पुणे,श्री.अशोक इंदलकर, पोलीस उप-निरीक्षक,शाहीद शेख, पोलीस अंमलदार, महेश पाटील, सुमित ताकपेरे, श्रीकांत दगडे, धनंजय ताजणे, गणेश ढगे, मॅगी जाधव, प्रदीप राठोड, आजीनाथ येडे, रविंद्र लोखंडे व नारायण बनकर यांनी केली आहे.